# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## जत (जि.सांगली) तालुक्यात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून शेतक-यांना शेतीपंपाचे कनेक्शन मिळण्याबाबत

**(१) ४३४३ (०२-०६-२०२०). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून शेतक-यांना सन २०१३ पासून शेतीपंपाचे हजारो वीज कनेक्शन देण्याचे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या शेतक-यांना वीज कनेक्शन देण्यात आले आहे, त्या ठिकाणी ओवरलोड मुळे ट्रान्सफार्मर जळण्याचे प्रमाण जास्त असून त्यांची लवकर दुरुस्ती केली जात नसल्याचे प्रकारे माहे जानेवारी, २०२० च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जत तालुक्यामध्ये मार्च २०१८ पूर्वी पैसे भरुन प्रलंबित असलेले एकही कृषीपंप अर्जदार नाहीत. सदर तालुक्यात जानेवारी २०१३ पासून दि. २२.०२.२०२३ पर्यंत ११२५८ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून दि. २२.०२.२०२३ अखेर २६३८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहे.

(२) हे खरे नाही.

जत तालुक्यातील सन २०१९-२० मध्ये ना-दुरुस्त झालेली सर्व रोहित्रे बदलण्यात आली असून सन २०२२-२३ मधील दि.२४.०२.२०२३ पर्यंत एकूण १०६६ रोहित्र ना-दुरुस्त झाली असून दि.२४.०२.२०२३ अखेर सर्व ना-दुरुस्त रोहित्रे बदलण्यात आली आहेत.

(३) सद्यस्थितीत सांगली मंडळामध्ये १७८ इतक्या दुरुस्त वितरण रोहित्रांचा साठा उपलब्ध आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील वीजवाहिन्या भूमिगत करण्याबाबत

**(२) ३२३९७ (१७-०९-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, कर्जत, खालापूर, पेण, रोहा, मुरुड, महाड, पोलादपूर (जि.रायगड) व दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात दिनांक ३ जून, २०२० रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे वीज खांब तसेच तारा तुटल्यामुळे दहा लाख ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत झाला असून वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी बराच कालावधी लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सागरी किनारी क्षेत्रातील विदयुत खांब गंजण्याचे प्रमाण जास्त असून वादळामुळे भविष्यात होणारे नुकसान टाळण्यासाठी ओव्हरहेड वीजवाहिन्या भूमिगत करण्याचा महावितरणाचा मंडळाने तयार केलेला ८३३ कोटी रुपयांचा प्रस्ताव महावितरणाच्या मुख्य कार्यालयात सादर करण्यात आला असतानाही आजमितीस सदर व भूमिगत वीजवाहिन्या प्रस्तावास शासनाची मंजुरी मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास विनाविलंब मंजुरी देण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील किनारपट्टीवरील ओव्हरहेड वीजवाहिन्या भूमिगत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
दि. ०३.०६.२०२० रोजी झालेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड जिल्हयातील वीजेचे खांब पडले होते. त्यामुळे एकूण ६,३८,८५९ इतक्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित झाला होता. एकूण बाधित झालेल्या वीज ग्राहकांपैकी ५० % वीज ग्राहकांचा वीज पुरवठा एका आठवडयात ७५% ग्राहकांचा वीज पुरवठा १५ दिवसांमध्ये व ९०% ग्राहकांचा वीज पुरवठा एका महिन्यात तसेच उर्वरित ग्राहकांचा वीजपुरवठा टप्पाटप्याने दि. २०.०८.२०२२ पर्यंत १००% पूर्ववत झाला.
(२) व (३) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाअंतर्गत ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयातील सागरी किनारपट्टी लगतच्या भागातील उच्चदाबव लघुदाब वाहिनी भूमिगत करण्यासाठीच्या एकूण रु.१८०० कोटीच्या कामाचा प्रस्तावास शासनाने दि.२१.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे.

तसेच सुधारीत वितरण क्षेत्र योजनेमध्ये रु.२१०३.०५ कोटींची कामे प्रस्तावित केली आहेत. त्यापैकी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील कामांना केंद्र शासनाची मान्यता मिळालेली असून कामांच्या निविदा प्रक्रियेधीन आहेत. रायगड, ठाणे व पालघर जिल्हयातील कामांना सन २०२३-२४ मध्ये मान्यता मिळणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाने प्रारुप आदर्श भाडेकरु कायदा मंजूर केल्याने 'पागडी' पध्दतीने राहणा-या इमारतीच्या मालकांना संरक्षण मिळण्याबाबत

**(३) ३४५२५ (१७-०१-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने प्रारुप आदर्श भाडेकरु कायदा मंजूर केल्याने 'पागडी' पध्दतीने राहणा-या इमारतीच्या मालकांना संरक्षण मिळणार असल्याने व भाडेकरुंवर अन्याय होणार असल्याने मुंबई व उपनगरातील २५ लाखाहून अधिक लोकांना बेघर व्हावे लागणार असल्याने केंद्राचा उक्त कायदा राज्यात लागू करण्यात येऊ नये अशी मागणी करणारे निवेदन मुख्यमंत्री यांना ९ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास खासदार, सचिव व खासदार, शिवसेना पक्ष तसेच दक्षिण मुंबई व मध्य मुंबईतील आमदार व मंत्री यांच्यासह शिवसेनेचे विभाग प्रमुख यांनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत, भाडेदारी व त्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या प्रकरणांचे निराकरण करण्याकरिता राज्यात लागू असलेल्या महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ मध्ये कोणतेही बदल प्रस्तावित नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी शहरातील वीजपुरवठा संबंधी लागू करण्यात आलेले सेक्शन ११, (सुरक्षा अनामत) चे नियम रद्द करण्याबाबत**

**(४) ३४९९४ (१२-०१-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील वीजपुरवठा संबंधी लागू करण्यात आलेले सेक्शन ११, (सुरक्षा अनामत) चे नियम तात्काळ स्थगित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास उर्जा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन नियमास स्थगिती देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या संबंधित नियमातील सुरक्षा ठेवीची आकारणी अनुज्ञेय आहे. त्यानुसार राज्यातील महावितरणच्या सर्व ग्राहकांना लागू असून त्यात फ्रँचायजी देण्यात आलेल्या मे. टॉरेंट पॉवर कंपनीलाही लागू आहेत.

---

**शेतक-यांकडील थकीत वीज देयकाची वसुली बचत गटांच्या माध्यमातून केल्याबाबत**

**(५) ४५११४ (२०-०९-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतक-यांकडील थकीत वीज देयकाची वसुली बचत गटांच्या माध्यमातून केल्याचे दाखवून महावितरणाच्या अधिका-यांनी सुमारे ४५ कोटी रुपयांचे कमिशन घेतल्याची बाब माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.

तथापि, सदर बाबत दि.२०.०२.२०२२ रोजी महावितरणच्या कार्यालयास निनावी तक्रार प्राप्त झाली आहे.

तसेच महिला बचत गटांना माहे नोव्हेंबर पर्यंत एकूण रु.४१.८३ कोटी प्रोत्साहन रक्कम देय आहे. त्यापैकी माहे फेब्रुवारी २०२२ पर्यंत रु. १६.४१ कोटी महिला बचत गटांना अदा करण्यात आलेले आहेत. परंतु, वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत निर्णय प्रलंबित असल्याने उर्वरित प्रोत्साहन रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(२) सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर चौकशीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील चेंबूर येथील सिध्दार्थ कॉलनीतील घरांचा वीज पुरवठा खंडीत केल्याबाबत**

**(६) ४६३५९ (०९-१०-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील चेंबूर येथील सिध्दार्थ कॉलनीतील तब्बल ३५०० घरांची वीज ऐन उन्हाळयात म्हणजेच माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान खंडीत करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नागरिकांची वीज खंडीत करण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या नागरिकांची वीज जोडणी पुर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ५६ (१) व १६३ (३) अन्वये ग्राहकाने वीज देयक न भरल्यास त्याचा वीज पुरवठा खंडीत करण्याचा वितरण परवाना धारकाला अधिकार आहे.

सिध्दार्थ कॉलनीतील बहुतांश ग्राहकांनी वीज बिलांचा भरणा केलेला नाही आणि वारंवार विनंत्या करुन तसेच वीज खंडीत करण्याच्या नोटीस बजावून सुध्दा संबंधितांनी थकबाकीच्या बिलांची रक्कम भरलेली नाही. सिध्दार्थ कॉलनीतील ३५०० ग्राहकांची थकबाकी रु.१०६ कोटी झाली आहे. त्यामुळे अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीव्दारे सदर ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.
(३) माहे जानेवारी, २०२३ पर्यंत २६५१ ग्राहकांचा वीजपुरवठा, थकीत बिलाच्या काही रकमेचा भरणा केल्यामुळे पूर्ववत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिमूरगव्हाण आणि देवेगाव (ता.पाथरी, जि.परभणी) येथे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजूर असलेल्या गावठाण फिडरची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(७) ५०२५० (०९-०३-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिमूरगव्हाण आणि देवेगाव (ता.पाथरी, जि.परभणी) येथे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मंजूर असलेल्या गावठाण फिडरची कामे वीज वितरणच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षीतपणामुळे गेल्या वर्षभरापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर फिडरचे काम पूर्ण न झाल्यामुळे उक्त गावातील नागरीकांना विदयुत पुरवठ्याच्या समस्यांना वारंवार तोंड द्यावे लागत असल्यामुळे गावचे सरपंच यांनी वीज वितरणच्या अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठ पुरावा करुनही अद्याप काम पूर्ण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काम पूर्ण करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या वीज वितरणच्या संबधित अधिकाऱ्यांवर तसेच गावठाण फिडरची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) (२) व (३) हे खरे नाही.
सिमूरगव्हाण आणि देवेगांव (ता. पाथरी, जि. परभणी) या गावांना ३३/११ केव्ही पाथरी उपकेंद्र येथून निघणाऱ्या ११ केव्ही बोरगाव वाहिनीवरुन वीज पुरवठा करण्यात येतो. ११ केव्ही बोरगाव वाहिनी ही कृषी व गांवठाण संमिश्र वाहिनी असून सिमूरगव्हाण व देवेगांव दोन्ही गावांचा विद्युत पुरवठा वेगळा करण्यासाठी गांवठाण वाहिनीच्या विलगीकरणाचा प्रस्ताव सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत समाविष्ट असून त्याची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद शहरातील अनेक वीज रोहित्रे पेट्या खुल्या स्थितीत असल्याबाबत

**(८) ५०३६२ (०९-०३-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहरातील अनेक वीज रोहित्रे उघडयावर, वर्दळीच्या मार्गावर, शहरतील गजबजलेल्या चौकामध्ये,

शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी रोहित्र्याच्या पेट्या अनेक ठिकाणी खुल्या असल्याने नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रोहित्रे बंदिस्त ठेवण्याची मागणी नागरिकांकडून वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय , त्यात काय निष्पन्न झाले, तदनुसार शहरातील रोहित्रे तात्काळ बंदिस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच यास जबाबदार असणा-याविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) (२) व (३) अंशत: खरे आहे.
उस्मानाबाद शहरातील आजतागायत एकूण २६ रोहित्रांच्या वितरण पेटयांचे दरवाजे नादुरुस्त असल्याचे आढळून आले, त्यापैकी एकूण १८ दरवाजांच्या दुरुस्तींची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ८ रोहित्रांच्या वितरण पेटयांच्या दुरुस्तींची कामे प्रगती पथावर आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील मुखेड, शिवरे, शिंगवे, करंजी खुर्द येथील विदयुत विभागाच्या वीज तारामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकाचे नुकसान झाल्याबाबत

**(९) ५०८५९ (१७-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील मुखेड, शिवरे, शिंगवे, करंजी खुर्द येथील शेतकऱ्याचे विदयुत वाहक तारामुळे शॉर्ट सर्किट होऊन ऊस, द्राक्ष आदी शेतीपिकांचे नुकसान झालेले असतांना देखील या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारची किती प्रस्ताव विदयुत विभागाकडे प्रलंबित आहे,
(३) असल्यास, सदरचे प्रकरणे तात्काळ निकाली काढून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यातय येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) निफाड (जि. नाशिक) तालुक्यातील मुखेड, शिवरे, शिंगवे, करंजी खुर्द गावात मागील दोन वर्षात एकूण १५ पीक जळीत प्रकरणे झालेली आहेत. त्यापैकी ०२ प्रकरणी महावितरण कंपनी जबाबदार नाही. सदर प्रकरणी नुकसान भरपाई आवश्यक नसल्याचे ०२ ग्राहकाने कळविले आहे. नुकसान भरपाईसाठी अपूर्ण कागदपत्रांची संख्या ०६ असून ०४ प्रकरणे नुकसान भरपाई देण्याच्या प्रक्रियेत आहेत. तसेच एका प्रकरणी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे.
(३) सदरचे प्रलंबित नुकसान भरपाई प्रकरणे निकाली काढणेबाबत विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून विहीत वेळेत जळीत अपघातांची चौकशी पूर्ण करुन नुकसान भरपाईबाबतचे अभिप्राय महावितरण कंपनीला देण्यात आलेले आहे. तसेच वारंवार विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून बैठका घेऊन प्रलंबित नुकसान भरपाई प्रकरणे निकाली काढण्याबाबत महावितरण कंपनी व विभाग स्तरांवर सूचित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात विद्युत यंत्रणा हाताळतांना अथवा अनावधनाने विद्युत तारांना स्पर्श होऊन झालेले प्राणांतिक अपघात**

**(१०) ५१३२२ (१९-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात विदयुत यंत्रणा हाताळतांना अथवा अनावधनाने विदयुत तारांना स्पर्श झाल्यास प्राणांतिक अपघात होऊन माहे एप्रिल, २०२१ ते जुलै,२०२२ या कालावधीत सुमारे ३८ नागरिकांचा, ४ जनावरांचा मृत्यू झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मृतांच्या नातेवाईकांना तसेच जनावरांच्या मालकांना कोणती तातडीने मदत दिली वा देण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे अंशत :खरे आहे.

विद्युत यंत्रणा हाताळतांना अथवा अनावधानाने विद्युत तारांना स्पर्श झाल्याने प्राणांतिक अपघात होऊन बुलढाणा जिल्हयात एप्रिल, २०२१ ते जुलै २०२२ या कालावधीत एकूण ५६ नागरिकांचा व ६७ जनावरांचा मृत्यू झालेला आहे.

(२) महावितरणच्या दि.२०.११.२००८ च्या परिपत्रकानुसार प्राणांतिक अपघात झालेल्या बाह्यव्यक्तीच्या वारसास तातडीची मदत म्हणून २०,०००/- रुपये व मृतजनावराच्या मालकांस तातडीची मदत म्हणून २,००० रुपये त्वरीत देण्यात येतात.तसेच आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर उर्वरित नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात येते.

एप्रिल, २०२१ ते जुलै २०२२ या कालावधीत नुकसान भरपाई लागू असलेल्या ४ मानवी प्रकरणांपैकी एका प्रकरणी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

तसेच नुकसान भरपाई लागू असलेल्या ५६ जनावरांच्या प्रकरणांपैकी ५ प्रकरणी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

उर्वरित घटनामध्ये आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर जनावरांच्या मालकास नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेकनूर, (ता. जि. बीड) येथील विजेच्या कामांना मंजुरी देण्याबाबत.**

**(११) ५२४२७ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, (जि. बीड) तालुक्यात १) नेकनूर, (ता. जि. बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्र ओव्हरलोड आहे. त्यामुळे सदर ठिकाणी अतिरिक्त ५ एम.व्ही चा ट्रान्सफार्मर बसवणे (२) नेकनूर, (ता. जि. बीड) हे लोकसंखेने मोठे गाव आहे. त्यामुळे तेथील ३३ केव्ही उपकेंद्रातून नेकनूर गावासाठी गावठाण फीडरचे काम करणे. ३) नेकनूर, (ता. जि. बीड) येथे महावितरण कार्यालयासाठी महावितरणच्या मालकीची जागा मुख्यरस्त्यावर असून सदर ठिकाणी महावितरण कार्यालयासाठी इमारत बांधून कार्यालय सुरु करण्यासाठी मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २१ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) नेकनूर ता.जिल्हा बीड येथील ३३ केव्ही पूर्ण भार नोंद असलेल्या उपकेंद्रावरील काही भार कमी करण्यासाठी येळंबघाट येथील उपकेंद्रामधील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता ३.१५ MVA वरुन ५ MVA पर्यंत वाढविण्याचे तसेच नेकनूर ३३/११ केव्ही उपकेंद्रातून ११ केव्ही नवीन गावठाण फीडरचे कामे

सुधारित वितरण क्षेत्र योजनेत प्रस्तावित आहे. नेकनूर येथील महावितरण कार्यालयाच्या प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येल्डा,( ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथे नवीन ३३ केव्ही उपकेंद्राला मंजुरी देण्याबाबत**

**(१२) ५२४२९ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येल्डा, (ता. अंबाजोगाई, जि. बीड) या गावातील परिसरातील कुरणवाडी, कुरणवाडी तांडा, मंग्याचीवाडी, राक्षसवाडी, ममदापूर, या सह इतर गावांना अंबाजोगाई ३३ केव्ही उपकेंद्रातून विदयुत पुरवठा करण्यात येतो परंतु सदर गावे डोंगराळ दुर्गम भागात असल्याने विजेचा तांत्रिक बिघाड झाल्यास येल्डा सह परिसरातील गावात विजेअभावी सतत मोठ्या समस्या निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावातील विजेच्या समस्या दूर करण्यासाठी येल्डा येथे नवीन ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर करून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत ची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २१ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन नवीन ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर करून कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे अंशत : खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) येल्डा ता. अंबाजोगाई जि. बीड येथे नवीन ३३ के.व्ही उपकेंद्र (१x५ एमव्हीए) सुधारीत वितरण क्षेत्र योजनेमध्ये (RDSS) प्रस्तावित केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज ( जि. बीड) तालुक्यातील दिनांक १ एप्रिल २०१८ नंतर कोटेशन भरलेल्या शेतकऱ्यांना HVDS योजना लागू करण्याबाबत.**

**(१३) ५२७१२ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यात दिनांक १ एप्रिल, २०१८ रोजी पूर्वी शेतीपंपासाठी कोटेशन भरलेल्या शेतकऱ्यांना उच्च दाब वाहिनी (HVDS) योजनेअंतर्गत कामे मंजूर करण्यात आली असून ज्या शेतकऱ्यांनी दिनांक १ एप्रिल, २०१८ नंतर कोटेशन भरले आहेत अशा शेतक्यांना उच्च दाबवाहिनीद्वारे (HVDS) योजनेत सामावून घेतले नसल्याने त्यांना अद्याप पर्यंत वीज जोडणी देण्यात आली नसल्याने विजे अभावी त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करवा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ एप्रिल २०१८ नंतर कोटेशन भरलेल्या शेतकऱ्यांना उच्च दाब वाहिनी (HVDS) योजना लागू करून त्यांना महावितरणच्या "एक शेतकरी एक डी.पी." योजनेअंतर्गत शेतीपंपासाठी कनेक्शन देणे बाबत ची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन २०१८ नंतर कोटेशन भरलेल्या किती शेतकऱ्यांना उच्च दाब वाहिनी (HVDS) योजना लागू करून कनेक्शन देण्यातबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२०अंतर्गत नजीकच्या लघुदाब वाहिनीपासून ज्या ग्राहकांचे अंतर २०१ ते ६०० मीटर आहे अशा अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्यात येते. केज तालुक्यामध्ये २०१ ते ६०० मीटर अंतर असलेले एकूण ९६४ ग्राहक आहेत. त्यापैकी ११२ अर्जदारांना वीज जोडणी देण्यासाठी कामांचे कार्यादेश देण्यात आले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) केज तालुक्यामध्ये २०१ ते ६०० मीटर अंतर असलेले दि. ०८.०२.२०२३ रोजी एकूण ९६४ अर्जदार आहेत. त्यापैकी ११२ अर्जदारांना वीज जोडणी देण्यासाठी कामांचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर ११२ अर्जदारांना वीज जोडणीचे काम प्रगतीपथावर असून ६० अर्जदारांकरिता पोल व डिपी स्ट्रक्चर उभे करण्यात आलेले आहेत. या व्यतिरिक्त ५४६ अर्जदारांना उच्चदाब वितरण प्रणाली व्दारे वीज पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. उर्वरित ३०६ ग्राहकांना पुढील टप्प्यात निधीच्या उपलब्धतेनुसार वीज जोडणी देण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवापूर (जि. नंदुरबार) तालुक्यमधील जीर्ण झालेल्या व लोंबकळणाऱ्या विद्युत तारांबाबत

**(१४) ५३०४३ (१९-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवापूर (जि.नंदुरबार) तालुक्यामधील आदिवासी भागांत जीर्ण झालेल्या व लोंबकळणाऱ्या विदयुत तारामुळे अपघात होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जीर्ण झालेल्या विदयुत तारा बदलण्यासाठी महावितरण कंपनीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
प्रतिबंधात्मक दुरुस्ती तसेच बिघाड दुरुस्ती योजनेअंतर्गत महावितरण कार्यालयातर्फे नेमुन दिलेल्या सूचीबध्द कंत्राटदारामार्फत तसेच महावितरणच्या कर्मचाऱ्यांमार्फत उपकरणांची दुरुस्ती तसेच देखभाल करण्यात येते. तसेच प्रतिबंधात्मक दुरुस्ती अंतर्गत जीर्ण झालेले पोल अथवा कंडक्टर बदलणे, आर्थिंग संदर्भातील कामे, रोहीत्रांची केबल आणि किटकॅट बदलणे इ. कामे कंत्राटदारामार्फत केली जातात.
नवापूर तालुक्याअंतर्गत येणाऱ्या गावांमधील लोंबकळत असलेल्या तारा देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत वाकलेले पोल दुरुस्त करणे, लघुदाब वाहिनीच्या तारा बदलणे, गंजलेले पोल बदलणे इ. कामे महावितरणच्या निवड सुचीबध्द कंत्राटदारामार्फत दुरुस्त करण्यात आलेल्या आहेत व याअनुषंगाने अपघात झाल्याचे दिसून येत नाही.
तसेच २३०० ठिकाणी स्पेसर्स बदलणे व ११५ कि.मी. लघुदाब वाहिनींच्या जीर्ण तारा बदलून ए.बी. केबल टाकणे अशी सर्व कामे सुधारीत वितरण क्षेत्र (आर.डी.एस.एस.) योजनेअंतर्गत प्रस्तावीत करण्यात आली असून ती मंजुरीनुसार पूर्ण करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागांत शेती आणि घरगुती वीज प्रणालीतील रोहित्र वारंवार नादुरुस्त होत असल्याबाबत

**(१५) ५३२९२ (२०-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागांत शेती आणि घरगुती वीज प्रणालीतील रोहित्र वारंवार नादुरुस्त होत असल्याचे माहे, ऑक्टोबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त असलेले रोहित्र वारंवार दुरुस्त होण्यासाठी २० ते ३० दिवसांचा कालावधी जात असल्याने शेतक-यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत असल्याने शेतक-यांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कायद्यामध्ये शेतक-यांना नुकसान भरपाईची तरतूद असूनही महावितरण कंपनीने आजपावेतो राज्यात एकाही शेतक-याला नुकसान भरपाई दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून शेतक-यांना तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.
राज्यात सद्यस्थितीत ७,४४,९३९ थ्री फेज रोहित्रे कार्यान्वित असून विविध तांत्रिक कारणाने काही रोहित्रे नादुरुस्त होत असतात. मात्र सदर रोहित्रे तातडीने दुरुस्त करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात येतो.
(२) हे खरे नाही.
रोहित्रे नादुरुस्त झाल्यास काही अपवादात्मक परिस्थिती वगळता रोहित्रे तातडीने बदलण्यात येतात.
राज्यात महावितरण मंडळ स्तरावर निविदा प्रक्रिया राबवून एकूण १९३४ रोहीत्र दुरुस्त करणाऱ्या एजन्सींची नियुक्ती करण्यात आली आहे. सन २०२२-२३ (दि.०१ एप्रिल, २०२२ ते दि.१०.०२.२०२३) पर्यंत एकूण २९, ७५५ वितरण रोहीत्रे नादुरुस्त झाले असून त्यापैकी २९, ४०३ बदलण्यात आली आहे. उर्वरित ३५२ रोहीत्रे बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) हे खरे नाही.
नादुरुस्त झालेले रोहीत्रे महावितरणतर्फे वेळोवेळी बदलण्यात येतात. तथापि, काही अपवादात्मक परिस्थितीत नादुरुस्त रोहीत्रे बदलणे शक्य नसल्यास पर्यायी उपलब्ध असलेल्या रोहीत्रावरुन तात्पुरत्या स्वरुपात वीज पुरवठा सुरळीत केला जातो.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उंदरी (ता. केज, जि. बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्राचा प्रस्तावाला मंजुरी देऊन काम सुरु करण्याबाबत**

**(१६) ५३४९९ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंदरी (ता. केज, जि. बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्राचा प्रस्ताव पाठवण्यात आला असून सदर उपकेंद्रासाठी जागाही निश्चित केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपकेंद्राचा प्रस्ताव कृषी आकस्मिकता निधीतुन (ACF) (जिल्ह्यातील वसुली मधून) केलेला असल्याने त्याचा सुधारणा आधारित वितरण क्षेत्र (RDS) योजनेत समाविष्ट केलेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचा प्रस्ताव महावितरणाच्या मुबई कार्यालयाला शक्यता पडताळणीसाठी पाठवला असता त्यात त्रुटी निघाल्याने सदर त्रुटींची पूर्तता करून परत मंजुरीसाठी मुंबई येथील मुख्य कार्यालयाला पाठवला असता अद्यापपर्यंत प्रस्तावास मंजुरी मिळाली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या परिसरातील होळ, कुंबेफळ, आडस, धारूर, केज, ३३ केव्ही उपकेंद्र अतिरिक्त भार असल्याने या पाचही उपकेंद्रावरील शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी फक्त चार ते पाच तास विदयुत पुरवठा केला जात असल्याने उंदरी, ता. केज, जि. बीड. येथील ३३ केव्ही उपकेंद्राच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन सदर उपकेंद्र ACF योजनेत त्वरित मंजूर करून काम सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन उपकेंद्राच्या प्रस्तावाला मंजुरी देऊन सदर उपकेंद्र ACF योजनेत मंजूर केले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
नवीन ३३/११ केव्ही उंदरी उपकेंद्राचा प्रस्ताव कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे.
(३) हे खरे आहे.
उपरोक्त नवीन उपकेंद्राच्या प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत प्रक्रियाधीन आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा विभागाकडे दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी सादर केलेले निवेदन महावितरणला प्राप्त झाले आहे. सदर उपकेंद्रांवरील सर्व कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी ठरवून दिलेल्या नियमानुसार चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यात येतो.
(५) नवीन ३३/११ के.व्ही. उंदरी उपकेंद्रांच्या प्रस्तावाची तांत्रिक सुसाध्यता पडताळणी कृषीपंप वीज जोडणी धोरण २०२० योजनेअंतर्गत पूर्ण झाल्यानंतर आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्धवत नाही.

---

## महावितरण अंतर्गत नवीन कल्याण-४ उपविभाग व शाखा कार्यालयाच्या निर्मितीस मान्यता देण्याबाबत

**(१७) ५३९३१ (२०-०१-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)महावितरण अंतर्गत असलेल्या कल्याण उपविभाग-१ व कल्याण उपविभाग ३ यांच्याकडे अनुक्रमे १,३३,०८० व १,३७,६०८ इतकी वीज ग्राहक संख्या असून महावितरणाच्या मॅनपॉवर रिव्हू सेल, एम..एस. डी कंपनी लि. प्रकाशगड, बांद्रा यांच्या कार्यालयीन आदेश क्र.२९ दिनांकित ०१ नोव्हेंबर, २०१० मध्ये नमूद केलेले ग्राहकांच्या प्रमाणित नमुन्यापेक्षा दुपटीहून अधिक असल्याने साधारण सेवाही नीटपणे पुरविल्या जात नसल्याने सदरहू ग्राहकांच्या तक्रारी दिवसेंदिवस वाढीस होत असल्याने कल्याण मंडळ-१, कल्याण पूर्व विभागांतर्गत शाखा कार्यालयाचे विभाजन करून नवीन कार्यालयाची निर्मिती करण्यात यावी अशा आशयाच्या मागणीचे एक सविस्तर निवेदन अन्य कागदपत्रांसह अधिक्षक अभियंता, महावितरण, कल्याण मंडळ-१, तेजश्री,२ रा मजला यांनी त्यांचे पत्र क्र. अ.अ./क-१/मासवि २०१३ दिनांकित २० सप्टेंबर २०२२ रोजी मुख्य अभियंता,म.रा.वि. वितरण कंपनी मर्या., कल्याण परिमंडळ यांना सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) महावितरणाच्या मॅनपॉवर रिव्हू सेलच्या कार्यालयीन आदेश क्र. एम.पी.आर. २९ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१० मध्ये ग्राहकांच्या प्रमाणित नमुन्यानुसार शहरा (महानगर क्षेत्र) साठी ग्राहक संख्या ६०,००० इतकी निश्चित करण्यात आलेली असून कल्याण उपविभाग-१ व कल्याण उपविभाग-३ यांच्याकडे ग्राहक संस्था दुपटीवर अधिक असल्याने तसेच या परिसरात मोठमोठे गृहप्रकल्प उभारणीची कामे प्रगती पथकावर असून येथील ग्राहक एक- दीड वर्षात १५,००,००० हून अधिक होणार असल्याने त्यांना दर्जेदार, सुरळीत २० वीज सेवा मिळावी यासाठी तसेच कल्याण विभागातील वीज समस्या सोडविण्यासाठी प्रलंबित असलेल्या नवीन कल्याण-४ उपविभाग व शाखा कार्यालयाच्या निर्मितीस मान्यता मिळणेबाबत एक सविस्तर पत्र कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधीनी दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२२ रोजी उपमुख्यमंत्री तथा मा.ऊर्जामंत्री यांना सादर केले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी कल्याण परिमंडळ कार्यालयाकडून कल्याण परिमंडळातील कल्याण पूर्व विभागांतर्गत येणाऱ्या कल्याण पूर्व उपविभाग-१, कल्याण पूर्व उपविभाग-२ व कल्याण पूर्व उपविभाग-३ यांची पुनर्रचना करुन प्रस्तावित कल्याण पूर्व उपविभाग-४ व कल्याण पूर्व उपविभाग-५ निर्माण करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

(३) सदर प्रकरणी ग्राहक मानंकानुसार कार्यवाही महावितरणच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे माळेगांव (ता. मुळशी , जि.पुणे) येथील विद्युतीकरणाबाबत**

**(१८) ५३९५३ (२०-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शेडगेवाडी, माळेगांव येथील खोंदाई देवी मंदिर, (ता. मुळशी, जि. पुणे) येथे विदयुतीकरण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं. लि. मुळशी विभाग, पुणे यांना दिनांक १८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे शेडगेवाडी, माळेगाव येथील खोंदाई देवी मंदिर, येथे विद्युतीकरण करण्यासाठी १.३८ कि.मी. लघुदाब वाहिनीसाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत (DPDC) कार्यकारी अभियंता, मुळशी विभाग, पुणे यांनी सदर कामाचे अंदाजपत्रक मंजूर केले असून सदर विद्युतीकरणाच्या कामासाठी जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांचेकडे रु.६,२५,२८०/- इतक्या निधीच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध औद्योगिक वसाहतीमध्ये महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीने डीपीआर (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट) मंजुर करण्याबाबत**

**(१९) ५३९९३ (२०-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध औद्योगिक वसाहतीमध्ये वीज पुरवठ्यामध्ये येणारे अडथळे दूर करून योग्य रीतीने मुबलक वीज पुरवठा होण्याकरिता सर्वेक्षण करून महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीने डीपीआर (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट) शासनाकडे मंजुरीसाठी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा डीपीआर अनेक दिवसांपासून मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, राज्यातील सर्व उद्योग वसाहतींमध्ये उद्योगांना चालना मिळण्यासाठी सदरचा डीपीआर तात्काळ मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. महावितरणने राज्यातील विविध औद्योगिक वसाहतींमध्ये वीज पुरवठयांमध्ये येणारे अडथळे दूर करुन योग्य रीतीने मुबलक वीज पुरवठा होण्याकरिता सर्वेक्षण करुन डीपीआर बनविण्यात आला असून पहिल्या टप्प्यातील रु.२६७.३७ कोटीच्या प्रकल्पांना दि.२२.०७.२०२१ रोजी मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने तत्वत: मान्यता दिली आहे.

(३) महावितरणव्दारे पहिल्या टप्प्यात एकूण १३ निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यापैकी ७ निविदांना प्रतिसाद मिळून सदर ७ निविदांचे काम प्रगतीपथावर आहे.

योजनेच्या टप्पा-२ मधील कामे सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) प्रणाली सक्षमीकरण (System Strengthening) मध्ये प्रस्तावित आहेत. सदर कामांना केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रिया प्राधान्याने करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई, (जि. बीड) येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयात स्क्रॅप रोहित्रांच्या बदल्यात नविन रोहित्र मिळणेबाबत**

**(२०) ५३९९७ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई, (जि. बीड) येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयाअंतर्गत एप्रिल- २०२१ ते मार्च-२०२२ व एप्रिल २०२२ ते आजपर्यंत पुढील प्रमाणे रोहित्र स्क्रॅप केली आहेत १) ६३ केव्हीए (३७१), २) १०० केव्हीए (१४९), ३) २५ केव्हीए (४५), हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रमाणे अंबाजोगाई विभागाअंतर्गत रोहित्र स्क्रॅप केलेले असुन सध्या गाळणी पथकात रोटेशनसाठी रोहित्रांचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे स्क्रॅप केलेल्या रोहित्रांच्या जागी नविन रोहित्र या विभागास मिळणे आवश्यक असल्याबाबत कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई. यांनी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड. यांना दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी पत्रान्वय कळवले होते, हे खरे आहे काय?

(३)असल्यास, सध्या रब्बी पीकाचा हंगाम पाहता रोहित्र नादुरुस्तीच्या प्रमाणात वाढ होत असुन ग्राहकांना नादुरुस्त रोहित्राच्या ठिकाणी दुरुस्त रोहित्र देण्यासाठी विभागीय कार्यालयात अडचण येत असल्याने ग्राहकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने स्क्रॅप रोहित्रांच्य बदल्यात नविन रोहित्र उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे उर्जा मंत्री व मुख्यअभियंता, लातूर, अधीक्षक अभियंता, बीड. यांच्याकडे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय?

(४)असल्यास वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून अंबाजोगाई विभागस किती व कोणकोणत्या प्रकारचे रोहित्र उपलब्ध करून दिले वा देण्यात येत आहेत,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अंबाजोगाई विभागाअंतर्गत ६३ केव्हीए, १०० केव्हीए व २०० केव्हीए चे नादुरुस्त रोहित्रे बदलण्यासाठी रोहित्रे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. रोहित्रे बदलण्यासाठी चक्राकार पध्दतीने पुरेसे रोहित्र उपलब्ध असून नादुरुस्त रोहित्रे तातडीने बदलण्यात येत आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

स्क्रॅप रोहित्रांच्या बदलण्यात नविन रोहित्रे उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.१७.११.२०२२ रोजीचे निवेदन मुख्य अभियंता, लातूर यांना प्राप्त झाले आहे. नादुरुस्त रोहित्रे बदलण्यासाठी दुरुस्त रोहित्रांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्यामुळे नादुरुस्त रोहित्रे वेळेवर दुरुस्त करण्यात आलेली आहेत.

(४) अंबाजोगाई विभागास स्क्रॅप रोहित्रांच्या बदल्यात १०० केव्हीएचे सन २०२१-२२ व २०२२-२३ या कालावधीत अनुक्रमे ४० नग व ७२ नग नविन रोहित्रे उपलब्ध करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुरणे बु, (ता. वेल्हे) व मौजे चिखली (ता. मुळशी जि. पुणे) येथे घरगुती वीजपुरवठा करण्याबाबत**

**(२१) ५४०१३ (१९-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुरणे बु, (ता. वेल्हे) व मौजे चिखली (ता. मुळशी , जि. पुणे) या गावांतील नव्याने निर्माण झालेल्या घरांना विदयुत पुरवठा सुरळीत होण्यासाठी ग्राहकांनी रितसर मागणी करुन अद्यापी वीज पुरवठा मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणी वीज पुरवठा करण्याकरिता उपकार्यकारी अभियंता, नसरापुर यांनी सर्वेक्षण केले असुन त्या कामाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. मौजे कुरणे बु. (ता. वेल्हे, जि. पुणे) येथील ११ नवीन प्रस्तावित वीज ग्राहकांसाठी १.२६ कि.मी. लांबीची लघुदाब वाहिनी उभारणी आवश्यक आहे. सदरील दोन्ही कामे मुळशी विभागीय कार्यालयाकडून NSC योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आली असून सदर कामे तात्काळ करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे बेंबळे( ता.माढा,जि.सोलापूर) येथील ऊस वाहतुकदाराचा पैसे घेवून मध्यप्रदेशात खुन केल्याबाबत**

**(२२) ५४०३९ (२४-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यामध्ये सर्वाधिक साखर कारखाने असून, ऊस वाहतुकदार हे ऊस तोडणी व वाहतुकीचा करार साखर कारखान्यासोबत करुन बीड, धुळे, नंदुरबार, नांदेड, अहमदनगर, यवतमाळ, हिंगोली तसेच कर्नाटक, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश,गुजरात या भागातून ऊस तोडणीसाठी मजूर करार करुन संबंधीत कारखान्याच्या कार्यक्षेत्रात आणतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास,मौजे बेंबळे (ता.माढा,जि.सोलापूर) येथील ऊस वाहतुकदार प्रशांत (आण्णा) महादेव भोसले हे मध्यप्रदेशातील ऊस तोड मजूर घेवून येत असताना दिनांक ३० ऑक्टोंबर,२०२२ रोजी खांडवा (मध्यप्रदेश) पासून अर्धा कि.मी.अंतरावर चिचोरी या ठिकाणी मुकदम व मजूर यांनी संगनमत करुन त्यांच्या जवळील पैसे व मोबाईल घेवून त्यांची निर्घृण हत्या केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊस वाहतूकदारांची मुकादम वा मजूर यांच्याकडून होणारी वित्त व जिवीतहानी टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) व (२) होय हे खरे आहे.

प्रशांत महादेव भोसले यांची दिनांक ३०.१०.२०२२ रोजी हत्या झाली आहे. सदर प्रकरणी दिनांक ०६.११.२०२२ रोजी सेधवा ग्रामीण पोलीस ठाणे, जिल्हा बडवाणी, मध्यप्रदेश येथे गु.र.नं.८३४/२०२२ भा.दं.वि. कलम ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) अशा घटना घडणार नाहीत यासाठी साखर कारखान्याचे संचालक व सदस्य यांची बैठक घेऊन दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात येतात.

तसेच अशा प्रकारच्या तक्रारीबाबत पोलीस स्टेशन स्तरावर वेळीच दखल घेऊन कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील धरणांचे नियंत्रण, कोकणातुन सुरु होणा-या नदी जोड प्रकल्पाचे कार्यालय व राष्ट्रीय विकास जलअधिकरण केंद्राचे कार्यालय ही औरंगाबाद येथे स्थलांतरित करण्याबाबत

**(२३) ५४०७० (२२-०१-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील मध्ममेश्वरसह भाम, भावली, मुकणे,वाकी या धरणांचे नियंत्रण नाशिकमधून केले जात असल्याने हे कार्यालय वैजापूर, औरंगाबादच्या नियंत्रणाखाली आणावे तसेच कोकणातुन सुरु होणा-या नदी जोड प्रकल्पाचेही कार्यालय नाशिकवरुन औरंगाबादला आणावे,राष्ट्रीय विकास जलअधिकरण केंद्राचे कार्यालय अशी काही कार्यालये औरंगाबादला आणल्यास मराठवाडयाच्या विकासासाठी महत्वाचे होईल असे म्हणणे काही लोकप्रतिनिधीचे असुन त्यानी या प्रकरणी सदरहू मागणी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय. खरे आहे.

(२) (अ) दारणा समुहात बांधण्यात आलेली भाम, भावली, वाकी व मुकणे ही चारही धरणे भौगोलिकरित्या नाशिक जिल्ह्यात स्थित आहेत. सदर चार धरणांमुळे बाधित झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन, भूसंपादन इ. कामे चालू असल्याने प्रकल्पबाधित वारंवार नाशिक येथील विभागीय कार्यालयात येतात. अशा परिस्थितीत कार्यालय स्थलांतरित झाल्यास प्रकल्पबाधितांसाठी गैरसोयीचे होईल. वैजापूर, औरंगाबाद या उपविभागीय कार्यालयाचे प्रत्यक्ष अंतर या चारही धरणापासून अधिक असल्याने आपत्कालिन प्र संगी तातडीने परिस्थिती हाताळणे जोखमीचे होऊ शकते. तसेच इगतपूरी, नाशिक येथे होणाऱ्या पर्जन्यामुळे नाशिक जिल्ह्यात निर्माण होणारी पूरस्थिती योग्यरित्या हाताळण्याच्या दृष्टीने धरणांचे द्वार परिचलन नियंत्रक अधिकाऱ्याचे मुख्यालय धरणाजवळ असणे आवश्यक असल्याने भाम, भावली, वाकी व मुकणे या धरणांचे नियंत्रण करणारे उपविभागीय कार्यालय वैजापूर, औरंगाबाद येथे स्थलांतरित करणे संयुक्तिक होणार नाही.

(ब) शासन निर्णय, जलसंपदा विभाग दि.१९.०९.२०१९ नुसार दुष्काळग्रस्त मराठवाडयासाठी व गिरणा उपखोऱ्यासाठी कोकणामधून पाणी वळविण्यासाठीच्या योजनांना तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच दि.१०.१२.२०२० च्या शासन निर्णयानुसार नदी जोड प्रकल्प समन्वय कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या रचनेत दि.०८.११.२०२१ च्या शासन निर्णयानुसार सुधारणा करण्यात आली आहे. प्रस्तावित नदीजोड प्रकल्प विविध महामंडळाच्या कार्यक्षेत्रात विभागले गेले आहेत. पाणी उपलब्धता प्रमाणपत्राबाबत कार्यवाहीचे कार्यालय (मुख्य अभियंता जलविज्ञान), संकल्पन व प्रकल्पाची छाननी इत्यादीबाबत नियंत्रक कार्यालय नाशिक येथे असल्याने मुख्य अभियंता (नदीजोड प्रकल्प) हे कार्यालय नाशिक येथे स्थापन करण्यात आले आहे. योजनांचे अन्वेषण, परिनिरिक्षण व संकल्पन यांची मुख्य कार्यालये १) मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक २) महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक येथे कार्यरत असल्याने संकल्पन अथवा अन्वेषणाची कामे जलदगतीने होतात. सर्व नदीजोड योजनांचे कार्यक्षेत्रही नाशिक जिल्हा तसेच कोकण खोऱ्यातील ठाणे व पालघर जिल्ह्यामध्ये असल्याने कोकणातून सुरु होणाऱ्या नदी जोड प्रकल्पाचे कार्यालय नाशिकवरुन औरंगाबाद येथे स्थलांतरीत होणे संयुक्तीक होणार नाही.

(क) राष्ट्रीय विकास जल अधिकरण केंद्र हे केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असल्याने याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली शहरातील पेन्शनपुरा भागात एका घरावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून अवैध गुटखा जप्त केल्याबाबत

**(२४) ५४०८३ (१८-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील पेन्शनपुरा भागात एका घरावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून साठविलेला ५.६९ लाख रुपयांचा गुटखा जप्त केल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी संबंधितांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले,चौकशीनुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी हिंगोली शहर पोलीस स्टेशन येथे दिनांक १६.११.२०२२ रोजी गु.र.नं.४६२/२०२२ भा.द.वि. कलम ३२८, २७२,, २७३, १८८ तसेच अन्न सुरक्षा अधिनियम कलम २६(२) (IV), २७ (३) d, २७ (३) e, ३० (२), ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली होती. आरोपींकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर प्रकरणी अधिकचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## वसमत (जि.हिगोंली) येथील लिंगी शिवारात कापसाच्या शेतात गांजाची झाडे जप्त केल्याबाबत

**(२५) ५४०८५ (२४-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिगोंली) येथील लिंगी शिवारात एका शेतातील कापसाच्या पिकात गांजाच्या झाडांचे संगोपन करण्यात आले असून सदर झाडे ही तेथील स्थानिक पोलीस पथकाने दिनाक २९ ऑक्टोबर,२०२२ रोजी शेतात छापा टाकून ४६ हजार २०० रुपयांच्या किमतीची ती झाडे जप्त केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वसमत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) (२) व ( ३) होय हे खरे आहे.

गोपनिय माहितीच्या आधारे दिनांक २९.१०.२०२३ रोजी मौजे लिंगी, जि.हिंगोली येथील शेतगट क्र.१८१ मध्ये आरोपीने कापसाच्या शेतात स्वत: च्या फायद्याकरीता गांजा ची ७ झाडांची लागवड केल्याचे आढळून आले आहे. पोलीसांकडून सदरची झाडे जप्त करण्यात आली आहेत.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन वसमत येथे गु.र.नं.४३५/२०२२, अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक पदार्थ कायदा १९८५ कलम २० (अ) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## जुहू (मुंबई) येथील म्हाडाच्या मालकीचा आठ एकरचा भूखंड झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी हडप केल्याबाबत

**(२६) ५४१४० (२९-०१-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुहू (मुंबई) येथे म्हाडाच्या मालकीचा आठ एकर भूखंड तत्कालीन म्हाडा व झोपडपट्टी पुनर्वसन प्रधिकरणातील अधिका-यांच्या संगनमताने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी बॉम्बे रिडेव्हलपमेंट कॉर्पोरेशने बळकविल्याचा गंभीर आरोप स्थानिक लोकप्रितनिधींनी केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड म्हाडाचा असून न्यायालयीन स्थगिती उठविण्यासाठी म्हाडाकडून प्रयत्न केले जातील असे मुंबई गृहनिर्माण मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०२३) :**(१) ते (४) मौजे-जुहू, ता. अंधेरी येथील न.भू.क्र.३०(पै) व ३१(पै) या म्हाडा भूखंडावर झोपडपट्टी खालील क्षेत्र २६१७३.६६ चौ.मी. असल्याने व त्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रास म्हाडा प्राधिकरणाची मंजूरी नसल्याने, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी २६१७३.६६ चौ.मी. क्षेत्र ग्राह्य धरण्यात यावे व उर्वरित ३२,९१३.०० चौ.मी. क्षेत्राचा ताबा म्हाडा परस्पर घेत असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दि.२२/८/२०२२ रोजी म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

या निर्णयाविरुध्द विकासकाने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून मा. उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेले आहेत. सदरहू स्थगिती उठविण्यासाठी म्हाडाकडून वरीष्ठ वकील (Senior Counsel) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यासाठी म्हाडामार्फत दि.४/१/२०२३ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे. चौकशी समितीचा वस्तुनिष्ठ अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. सध्या प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

---

## सोलापूर शहरातील पूर्व मंगळवार पेठ भागातीला कुंभार वेस येथे कपड्याच्या दुकानात चोरी झाल्याबाबत

**(२७) ५४१६१ (२४-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील पूर्व मंगळवार पेठ भागातील कुंभार वेस येथे चोरट्यांनी कपड्याच्या दुकानातून ३१ हजारांची रोकड चोरी केली असून परिसरातील अन्य दुकानांमध्येही चोरीचा प्रयत्न केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदरहू चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे काय,असून त्याच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०२३) :**(१) सोलापूर शहरातील पूर्व मंगळवार पेठ येथील कुंभारवेस भागात आरोपींनी एका कपड्याच्या दुकानातुन एकुण ३१ हजार रुपयांची रोकड चोरी केल्याची घटना घडली आहे. तथापि, परिसरातील अन्य दुकानामध्ये चोरीचा प्रयत्न झाल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आलेले नाही.

(२) सदर प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाणे, सोलापूर येथे गु.र.नं.६०२/२०२२ भा.दं.वि कलम ३८०, ४५४, ४५७, ४२७ अन्वये दिनांक ०७.११.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेतील एका आरोपीस पोलीसांनी अटक केली असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील जलसंपदा विभागाच्या विभागीय व उपविभागीय कार्यालयाच्या इमारती जुन्या व जीर्ण झाल्याबाबत

**(२८) ५४१८२ (२२-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलसंपदा विभागाच्या चंद्रपूर शहरातील विभागीय व उपविभाग कार्यालयाच्या इमारती जुन्या व जीर्ण अवस्थेत असल्याने कोणतीही दुर्घटना होवून जीवित व वित्त हानि होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील सर्व विभागीय कार्यालये व उपविभाग कार्यालयांसाठी एक प्रशस्त इमारत तसेच सोबत कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थान बांधण्यासाठी प्रस्तावित आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जीर्ण झालेल्या इमारती ऐवजी नवीन इमारत व शासकीय निवासस्थान बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) होय.

चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालयांतर्गत चंद्रपूर शहरातील कार्यालयांच्या इमारती या जवळपास ४० ते ५० वर्ष जून्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक ०३.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता यांना याबाबत कार्यवाही करणेबाबत अवगत केले आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयामार्फत बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यालयास माहिती पुरविण्याकरीता दिनांक ०३.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील शेतक-यांना त्यांच्या मागणीनुसार वीजपुरवठा करण्याबाबत

**(२९) ५४१८४ (२०-०१-२०२३). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील शेतक-यांच्या पिकाला जास्त पाणी देण्याची आवश्यकता असतानाही वीजे अभावी पिकाला पाणी मिळत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्माबाद तालुक्यात शेतक-यांना २४ तासांपैकी दिवसा १२ तास थ्री फेज तर रात्रीच्या वेळी १२ तास लाईट देण्याची तसेच थ्री फेज लाईट गेल्यानंतर २ फेज लाईट ठेवण्याची मागणी शेतक-यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज विभागातील अधिकारी थ्री फेज लाईट गेल्यानंतर फक्त सिंगल फेज लाईट ठेवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टु फेज लाईट ठेवली तर कमी पाणी असणा-या शेतक-यांच्या मोटारी चालून शेतक-यांचे नुकसान होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करून शेतक-यांना पाणी मिळण्याच्या दृष्टीने शेतक-यांच्या मागणीनुसार वीज पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.
नांदेड जिल्हयातील धर्माबाद तालुक्यासह संपुर्ण राज्यात मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार कृषी वाहिन्यांवर ८ तास दिवसा किंवा ८ तास रात्री असा थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येतो.
(२) महावितरण कंपनीस शेतकऱ्यांकडून अशी कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.
(३) हे खरे आहे.
मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार कृषी भार व्यवस्थापन योजने अंतर्गत संपूर्ण राज्यातील सिंगल फेज कृषी वाहिन्यांवर नियोजित थ्री फेज वीज पुरवठा कालावधी नंतर उर्वरित कालावधीत फक्त सिंगल फेज वीज पुरवठा केला जातो.
(४) संपूर्ण राज्यात मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार कृषी वाहिन्यांवर ८ तास दिवसा किंवा ८ तास रात्री असा थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येतो आणि सिंगल फेज योजनेअंतर्गत कृषी वाहिन्यांवर उर्वरित कालावधीत फक्त सिंगल फेज योजनेअंतर्गत कृषी वाहिन्यांवर उर्वरित कालावधीत फक्त सिंगल फेज वीज पुरवठा करण्यात येतो.
(५) नांदेड जिल्हयातील धर्माबाद तालुक्यासह संपूर्ण राज्यात मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार कृषी वाहिन्यांवर ८ तास दिवसा ८ तास रात्री असा थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येतो व सिंगल फेजिंग योजनेअंतर्गत कृषी वाहिन्यांवर उर्वरित कालावधीत फक्त सिंगल फेज वीज पुरवठा करण्यात येतो.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जव्हार येथील आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी निविदा प्रक्रिया राबविली नसल्याबाबत

**(३०) ५४१८६ (१८-०१-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय जव्हार मध्ये आदिवासी बांधवासाठी राबविलेली खावटी अनुदान योजनेत अधिका-यांनी रोखीने आणि निविदा प्रक्रिया न राबविता सुमारे ५८ लक्ष खर्च केल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२९-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही.
खावटी अनुदान वाटप योजना राबविण्याकरिता प्रादेशिक कार्यालय जव्हार अंतर्गत जव्हार,डहाणू,बोरीवली ,शहापूर व पेण या दुर्गम भागात स्थानिक पातळीवरून मिळेल त्या परिस्थितीत वेळोवेळी वाहने व हमाल उपलब्ध करून खावटी कीट चे वाटप आदिवासी बांधवांना करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्यातील पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३१) ५४१९१ (२०-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, चंद्रपूर येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदे रिक्त असल्याने विकास कामांवर तसेच प्रशासकीय कामकाजावर याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदेभरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०२३) :** (१) जलसंपदा विभागाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांपैकी सद्य:स्थितीत ५१% पदे रिक्त आहेत. त्यामुळे पदे रिक्त आहेत.
(२) या विभागाकडे प्रकल्प सर्वेक्षण/अन्वेषणाची कामे आहेत. अधिकारी व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याने कामावर ताण येत आहे, हे खरे आहे.
(३ )सरळसेवा भरती व पदोन्नतीच्या माध्यमातून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून, सन २०२३ च्या नियतकालिक बदल्या, पदोन्नती तसेच सरळसेवेने नियुक्तीव्दारे या विभागातील रिक्त पदांवर अधिकारी, कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हयात शबरी महामंडळामार्फत राबविलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांपासून लाभार्थी वचित असल्याबाबत

**(३२) ५४१९५ (१८-०१-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शबरी महामंडळामार्फत राबविलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांना प्रसिद्धी न देता राबविण्यात आल्याने ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने जिल्हानिहाय वाटपाचे उदिष्ट्य ठरवून दिले असताना ही अधिका-यांनी नियमाचे आणि निकषाचे पालन केले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०५-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.,नाशिक या कार्यालयाकडून दि.१४/०३/२०२० रोजी राज्यातील दैनिक लोकमत वर्तमानपत्रात N.S.T.F.D.C,नवी दिल्ली पुरस्कृत योजनेसाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करण्याकामी जहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि,दि.२२/०३/२०२० पासून देशात टाळेबंदी जाहिर झाली.यामुळे इच्छुक उमेदवारांना कर्ज योजनेसाठी मुदतीत अर्ज सादर करता आले नाही.त्यामुळे टाळेबंदी शिथील झाल्यानंतर दि.१७/१०/२०२० रोजी राज्यातील दैनिक लोकमत वर्तमानपत्रात पुन्हा जहिरात प्रसिध्द करून इच्छुक उमेदवारांनी अर्ज सादर करण्यासाठी दि.३१/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती यानंतरही सदर मुदत दि.३१/०१/२०२१ पर्यंत वाढविली.त्याव्यतिरीक्त इच्छुक उमेदवारांना इंटरनेट लिंक उपलब्ध करुन देऊन ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली होती.

वाटपा अभावी निधी परत जाऊ नये यासाठी ज्या शाखा कार्यालयांचे प्रस्ताव प्रथम प्राप्त होतील अशा शाखा कार्यालयांना देण्यात आलेल्या लक्षांकानुसार कर्ज मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव, बोरगाव व भनारहेटी (ता. गोंडपिपरी, जि.चंद्रपूर) येथील उपसा सिंचन योजनेचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ५४२०८ (२०-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव, बोरगाव व भनारहेटी (ता. गोंडपीपरी, जि.चंद्रपूर) उपसा सिंचन योजनेचे काम शासनाच्या मंजुरी अभावी गेली अनेक वर्षे प्रलंबित असल्याने विभागातील विकासाची कामे झाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनांना प्रशासकीय मंजुरी, सर्वेक्षण व डीपीआरचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही. सदर उपसा सिंचन योजनेचे काम शासनाचे मंजुरी अभावी प्रलंबित नाही.

(२) सदरच्या योजना हया उसिंयो असल्याने खालील विविध टप्प्यात नियोजन करण्यात येत आहे.

(i) सदरहु योजनांना विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर विभाग नागपूर, यांनी त्यांचे दि. १९/१०/२०२२ अन्वये पिक पध्दतीस मंजुरी दिली आहे. प्राप्त मंजुर पिक पध्दतीप्रमाणे पाणी उपलब्धता प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.

(ii) मुख्य अभियंता, जल व धरण सुरक्षितता, नाशिक यांचेकडून पाणी उपलब्धतेची निश्चिती झाल्यानंतर त्याआधारे पुर्व व्यवहारता अहवालास मान्यता घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(iii) शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१४/(९६/१४)/ जसं(आस्था) दि. २६/११/२०१६ मधील परिच्छेद क्र.१ अंतर्गत शासकीय खर्चाने मोठया उपसा सिंचन योजना (२०००हे. वरील) किमान एक अट पूर्ण होत असल्यास अपवाद म्हणून घेण्याबाबतचा अधिकार मा. मुख्यमंत्री यांना असल्याने तसा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांकडे मान्यतेकरिता सादर करणे नियोजित आहे.

(iv) त्यास मान्यतेनंतर सर्व्हेक्षण व अन्वेषणचे अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन त्या आधारावर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून शासनास सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) तेलंगणा राज्याकडून प्रस्तावित तुमडीहेटी बॅरेजच्या नियोजनात बदल प्रस्तावित असल्याने, विषयांकित उपसा सिंचन योजनेचे फेरनियोजन करावे लागले आहे.

---

## मांजरसुभा (ता. जि. बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्रातील ०५ एम.व्ही. चा ट्रान्सफार्मर नादुरुस्त असल्याबाबत

**(३४) ५४२५७ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरसुभा (ता. जि. बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्रातील ०५ एम.व्ही. चा ट्रान्सफार्मर नादुरुस्त झाला असल्याने त्यापरिसरात विजेसंबंधी मोठ्याअडचणी निर्माण झाल्या असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ट्रान्सफार्मर दुरुस्त करून त्वरित कार्यान्वित करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दि. २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून सदर ठिकाणी ०५ एम.व्ही. चा ट्रान्सफार्मर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मांजरसुभा, ता. जि. बीड येथील ३३ केव्ही उपकेंद्रातील ५ एम.व्ही.ए. चा ट्रान्सफार्मर नादुरुस्त झाला होता परंतु नादुरुस्त पॉवर ट्रान्सफार्मर वरील लोड त्याच उपकेंद्रामधील दुसऱ्या ५ एम.व्ही.ए. पॉवर ट्रान्सफार्मर वर शिफ्ट करुन सर्व ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात आला.

(२) हे खरे आहे.
(३) सदर पॉवर ट्रान्सफार्मर ३३/११ केव्ही मांजरसुभा उपकेंद्रामध्ये दि.०८.१२.२०२२ रोजी कार्यान्वित करण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राजापूर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील धरणांच्या कालव्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(३५) ५४२९० (२२-०१-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यात कामे पूर्ण झालेल्या धरणांमध्ये मुबलक प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असतानाही केवळ कालव्यांची कामे अपूर्ण असल्याने धरणांमध्ये साठलेल्या पाण्याचा स्थानिक ग्रामस्थांना शेती वा पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग करणे शक्य होत नसल्याची बाब दि. २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, राजापूर तालुक्यातील अनेक महत्त्वाकांक्षी धरणांची कामे प्रलंबित असल्याने आणि धरणांतील गाळ न उपसल्याने सिंचनाची गती मंदावली आहे, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राजापूर तालुक्यातील कामे पूर्ण झालेल्या धरणांच्या कालव्यांची कामे पूर्ण करण्यासह अपूर्ण धरणांची कामे त्वरेने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०४-२०२३) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
राजापुर तालुक्यामध्ये ४ ल. पा. प्रकल्प पूर्ण झाले आहेत. तसेच २ मध्यम व ४ ल. पा. प्रकल्प असे एकूण ६ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.
पूर्ण झालेल्या एकूण ४ ल.पा प्रकल्पांद्वारे जून २०२२ पर्यंत ५९७ हे. (ICA) इतकी सिंचन क्षमता निर्मित झाली आहे.मात्र,या प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये काही भागात झालेले अतिक्रमण,भूसंपादनातील अडचणी, कालवे नादुरुस्त होणे इत्यादी कारणांमुळे पाणी पुरविण्यात अडथळे निर्माण होत आहे.
प्रगतीपथावरील प्रकल्पांपैकी १ मध्यम व ३ ल. पा. प्रकल्पांमध्ये पाणीसाठा निर्माण झाला असून कालव्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
राजापुर तालुक्यामधील पूर्ण झालेल्या ४ ल. पा. प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे. तसेच प्रगतीपथावरील प्रकल्पांच्या कालव्यांची कामे अद्याप पूर्ण न झाल्याने सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत नाही.
तथापि, धरणांतील गाळ न उपसल्याने सिंचनाची गती मंदावली आहे, हे खरे नाही.
(३) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंतरगांव (ता.हिवरी, जि. यवतमाळ) येथील आदिवासी आश्रमशाळा परिसरातील आदिवासी लाभार्थ्यांना वितरित करण्यात आलेले साहित्य पडुन असल्याबाबत

**(३६) ५४३२८ (१८-०१-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंतरगांव (ता. हिवरी, जि.यवतमाळ) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळांच्या परिसरामध्ये आदिवासी लाभार्थ्यांना वितरीत करण्याकरिता आणलेले साहित्य तसेच मळणी यंत्र, तेलपंप ठेला काही वर्षापासुन विनावापर पडून असल्याचे दिनांक १२ जून २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ब-याच वर्षापासुन विनावापर पडून असलेल्या साहित्याची मोडतोड झाली असून लाभार्थ्यांना त्याचा लाभ घेता आला नसल्याने शासनाच्या निधीचा अपवयय झाला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास शासनाने प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (१७-०३-२०२३) :** (१) हे, खरे आहे.
(२) व (३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, पांढरकवडा अंतर्गत साहीत्य खरेदी व पुरवठा यात अनियमितता झालेली असल्याचे निदर्शनास आल्याने सकृत दर्शनी जबाबदार दिसून आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर पांढरकवडा पोलिस ठाणे येथे दिनांक ०४.०८.२००९ रोजी FIR दाखल करण्यात आलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे साहीत्या वाटपाविना राहीले आहे.
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांनी दिनांक ०५.०१.२०१३, ०२.०७.२०१३ रोजीच्या पत्रांन्वये मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे सुस्थितीतील साहित्य वाटप करणेबाबत परवानगी मागितली आहे. तसेच दि. ७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये देखील सुस्थितीतील साहित्य वाटप करणेबाबत व वापराअयोग्य साहित्य निर्लेखित करण्याबाबत परवानगी मागितली आहे. मात्र अद्याप परवानगी मिळालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजनेचे फेरसर्वेक्षण करण्याबाबत**

**(३७) ५४३२९ (२२-०१-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील अनेक गावांचा समावेश जनाई शिरसाई व पुरंदर उपसा सिंचन योजनेत झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील अस्तीत्वात असलेल्या तलावांचे व नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या तलावांचे सर्वेक्षण करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त सर्वेक्षण करून पूर्ण करून योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) १) जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजना -
प्राथमिक सर्वेक्षण पूर्ण करून योजनेतील समाविष्ट तलाव भरणे व नव्याने तलाव समाविष्ट करण्यासाठी तत्वत: मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. २) पुरंदर उपसा सिंचन योजना- खडकवासला समूहामधून नियोजनानुसार, पुरंदर उपसा सिंचन योजनेस वार्षिक ४.०० टी. एम. सी. पाणी वापरास मान्यता आहे. या पाणी वापरानुसार पंप कॅपॅसिटी, रायझिंग मेन ची वहन क्षमता व नियोजित सिंचन क्षेत्राचे नियोजन झालेले आहे. त्यानुसार कामे पुर्णत्वास आहेत. तसेच योजना पुर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत पंप कॅपॅसिटी, रायझिंग मेनची वहन क्षमता व नियोजित सिंचन क्षेत्र यामध्ये बदल शक्य नसल्याने सदर योजनेचे फेर सर्वेक्षण शक्य नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उजनी (ता. दौंड, जि. पुणे) धरणाच्या बॅक वॉटर क्षेत्रात बुडीत बंधारे बांधणेबाबत

**(३८) ५४३३९ (२२-०१-२०२३). अॅड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावातील शेती मोठ्या प्रमाणवर उजनी धरणाच्या बॅकवॉटरवर (फुगवटा क्षेत्र) अवलंबून आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागात बुडीत बंधारे बांधण्याबाबत शेतकऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
याबाबत लोकप्रतिनिधी यांचे दौंड (जि.पुणे) तालुक्यातील उजनी धरणाच्या बॅक वॉटर क्षेत्रात बुडीत बंधारे बांधणेबाबतचे दि.२७.०७.२०२२ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.
(३) उजनी जलाशयाच्या फुगवटा क्षेत्रात बुडित बंधारे बांधणे बाबतच्या मागणी नुसार दौंड (जि.पुणे) तालुक्यातील फुगवटा क्षेत्रात प्राथमिक पाहणी अंती बुडित बंधा-यासाठी सात ठिकाणे निश्चित केली आहेत. तथापी, मौजे ऑटेवाडी, ता. कर्जत येथे प्रस्तावीत उच्च पातळी बंधा-यामुळे वरील सर्व बुडीत बंधारे औटेवाडी उच्च पातळी बंधा-याच्या बुडीत क्षेत्रात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे.
मौजे औटेवाडी ता.कर्जत, जि. अहमदनगर येथे ७५.३९ दलघमी क्षमतेचा उच्च पातळी बंधारा प्रस्तावित केला असून या बंधाऱ्यामुळे नदी पात्रात देऊळगाव राजे को. प. बंधाऱ्यापर्यंत पाणीसाठा होणार आहे. उजनी प्रकल्पाच्या जलाशयावरील ३४०३३ हे. (ICA) क्षेत्रापैकी मौजे औटेवाडी ता.कर्जत, जि.अहमदनगर या प्रस्तावीत उच्च पातळी बंधा-यामुळै एकुण ८४९३ हे (ICA) हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार असुन त्यापैकी दौंड तालुक्यातील क्षेत्र ४८०५ हे. (ICA) इतके आहे.
त्यानुसार औटेवाडी उच्च पातळी बंधा-याचा प्रशासकीय मान्यतेचा अहवाल तयार करून छाननीसाठी राज्य तांत्रिक सल्लागार समिती पुणे-२ यांना दि.१८.२.२०२२ रोजी सादर केला आहे.
राज्य तांत्रिक सल्लागार समितीची ७१ वी बैठक दि.१८.१०.२०२२ रोजी संपन्न झाली असुन सदर बैठकीत उपस्थित शे-यांची पुर्तता क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे. सदर प्रशासकीय मान्यता झाल्यानंतर या योजनेचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे. त्यामुळे भिमा उजनी धरणाच्या बॅकवॉटरवर (फुगवठा) क्षेत्रावर बुडीत बंधारेची आवश्यकता भासणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वस्तू व सेवा कर विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(३९) ५४३४१ (२३-०१-२०२३). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वस्तू व सेवाकर विभागातील कंत्राटी कर्मचारी यांचे कंत्राट माहे मार्च-२०१९ पासुन बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कर्मचारी संघटना व लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने ओडिसा व इतरत्र राज्याप्रमाणे राज्यातील कंत्राटी कर्मचारी यांना कायम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०३-२०२३) :** (१) वस्तू व सेवा विभागातील कर्मचारी यांच्या कंत्राटाचा कालावधी दिनांक ३१.०३.२०१९ रोजी संपुष्टात आला आहे.
(२) होय.
(३) वस्तू व सेवा कर विभागामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटदाराची ई-निविदा प्रक्रिया राबवून करण्यात येत असल्यामुळे सदर कर्मचारी हे कंत्राटदाराच्या आस्थापनेवर कार्यरत असून त्यांची नियुक्ती करणे व त्यांची सेवा खंडीत करणे या बाबी कंत्राटदारांच्या स्तरावरून केल्या जातात. त्यांचे वेतनही कंत्राटदाराकडून अदा करण्यात येते.
उपरोक्त परिस्थितीत वस्तू व सेवा कर विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेची अनुषंगिक कामे पूर्ण करण्याबाबत

**(४०) ५४३४५ (२२-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील पुरंदर उपसा सिंचन योजनेची अनुषंगिक कामे पूर्ण करण्यासाठी अवशिष्ट निधीमधून रुपये ५७.७२ कोटी निधी उपलब्ध करून प्रशासकीय मान्यता देण्यात यावी, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन जलसंपदा मंत्री यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उक्त कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पुरंदर उपसा सिंचन योजनेची अनुषंगिक कामे पुर्ण करण्यासाठी वार्षिक आखणी अंतर्गत प्रत्येक वर्षी निधी उपलब्ध होत असतो. परंतु पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या सुप्रमा प्रस्तावास मान्यता प्राप्त नसल्याने सदर निधी खर्च करता येत नाही.
पुरंदर उपसा सिंचन योजनेचा रू. ४६०.९५ कोटी किंमतीचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मा. मंत्रीमंडळ बैठकीत दि.३१/०१/२०२३ रोजी मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पर्यटन वाढीला भर देण्यासाठी जलसंपदा आणि पर्यटन विभाग यांच्या संयुक्तपणे राबविण्याच्या उपक्रमाचा प्रस्तावाबाबत

**(४१) ५४३५१ (२२-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील धरण क्षेत्र नजिकची अतिरिक्त जमीन, विश्रामगृह व रिक्त वसाहती पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पी पी पी) या तत्त्वानुसार खाजगी यंत्रणेकडून विकसित करून पर्यटन वाढीला भर देण्यासाठी जलसंपदा आणि पर्यटन विभाग यांच्या संयुक्तपणे राबविण्याच्या उपक्रमाचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावाला शासनाने मान्यता दिली आहे काय , असल्यास, हे उपक्रम किती कालावधी सुरू करण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१), (२) व (३) - जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील धरणक्षेत्रानजीकच्या अतिरिक्त जमिनी, विश्रामगृहे व रिक्त वसाहती Public Private Partnership (PPP) या तत्वावर खाजगी यंत्रणांकडून विकसित करणे व व्यवस्थापन करणेकरीता शासनाने दिनांक १७.०६.२०१९ च्या शासन निर्णयानुसार धोरण निश्चित केले आहे.
या धोरणातील तरतूदीनुसार जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील विविध पाटबंधारे विकास महामंडळाकडे असलेल्या पर्यटनक्षम जमिनी, स्थळे, विश्रामगृहे, इमारती,वसाहती सार्वजनिक -खाजगी भागीदारी (Public Private Partnership) (PPP) या तत्वावर विकसित करण्याकरीता कराव्या लागणा-या कामांकरीता निविदा प्रक्रिया राबविणे क्रमप्राप्त असून या निविदा प्रक्रियेकरीता Standard Bid Document (SBD) चा मसुदा अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पर्यटन वाढीकरीताची कामे हाती घेणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील म्हाडा योजनेतील घर देण्याचे आमिष दाखवून व्यवसायिकांची केलेली फसवणुक

**(४२) ५४४७७ (१८-०१-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील ओशिवरा आणि मालाड परिसरातील म्हाडा योजनेत निम्म्या किंमतीतील २ फ्लॅटचे आमिष दाखवून एका व्यवसायिकाची साडेचार कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार गोरेगाव परिसरात उघडकीस आला असल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी केदार साटम या व्यवसायिकांविरुद्ध वनराई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी दि.०७/१०/२०२२ रोजी केदार साटम व इतर दोन इसमांविरुद्ध वनराई पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र.५७४/२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६५, ४६७, ४६८, ४७४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
सदर गुन्ह्यातील तपासात तीन आरोपींचा सहभाग असल्याचा निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लेंडी प्रकल्प (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील कार्यकारी अभियंता देगलूर येथील कार्यालयच्या इमारतीच्या दुरुस्तीस झालेला गैरव्यवहार

**(४३) ५४५४५ (२२-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील लेंडी प्रकल्प कार्यकारी अभियंता देगलूर येथील कार्यालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता रुपये ५० लक्ष खर्च दाखविण्यात आला असून गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २००२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पात देगलूर यांच्या अधिनस्त कार्यालय इमारत पुन:दुरुस्ती व गेटपर्यंत खडीकरण दाखवून आणखी रुपये ५० लक्ष रुपयाचा गैरव्यवहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगांव (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या लघुपाटबंधारे प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनींचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत

**(४४) ५४५८९ (१८-०१-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगांव (जि.जळगाव) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमीनी लघुपाटबंधारे प्रकल्पासाठी संपादीत केले असून न्यायालयाने वाढीव मोबदला मंजुर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तापी महामंडळाकडे सन २०१६ ते २०२० पर्यंत वेळोवेळी न्यायालयीन निकालानुसार वाढीव मोबदल्याची मागणी करण्यात आलेली असून, तापी महामंडळाच्या वतीने कोर्टामध्ये लोक अदालतमध्ये मौजे मुंदखेडा / पातोंडा गावातील शेतकऱ्यांच्या एका वर्षामध्ये ३३ टक्केप्रमाणे संपूर्ण रक्कम अदा करण्याच्या अटीवर लोक अदालतच्या तडजोडी करण्यात आलेल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तडजोडीनुसार ३ ते ४ वर्षाचा कालावधी होऊनसुध्दा फक्त ३३ टक्के रक्कम अदा करण्यात आलेली आहे, तसेच मौजे ओढरे / चितेगांव / धानवड / नागदुली या प्रकल्पातील शेतकऱ्यांना मा. उच्च न्यायालयाने आदेशीत करुन सुध्दा हायकोर्ट आदेशानुसार रक्कम अदा झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तापी महामंडळामध्ये पुरेसा निधी उपलब्ध न होऊ शकल्यामुळे १५% व्याजाचा भुर्दंड शासनावर पडत असल्याने, लोक अदालत व हायकोर्टाच्या आदेशाचे पालन करणे शक्य होत नाही. त्यामुळे शासन परिपत्रक अर्थ विभागाच्या लेखाशिर्ष ८६७४ शासनाने ठेवलेल्या प्रतिभुती ठेवी (न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभुती रक्कमा संगणक क्रमांक ८६७४००१९) या लेखाशिर्षाखाली रक्कम उपलब्ध करुन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना प्रलंबित भूसंपादन मोबदला तात्काळ मिळावा यासाठी, स्वतंत्र निधी मंजुर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे.
मौजे मुंदखेडा/पातोंडा गावातील तडजोडी झालेल्या एकूण २५० भूसंदर्भ प्रकरणांपैकी १२१ भूसंदर्भ प्रकरणांमध्ये संपूर्ण रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत व तडजोडी झालेल्या उर्वरीत १२९ प्रकरणांमध्ये शासनामार्फत वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीच्या मर्यादेनुसार ३३% पेक्षा जास्त रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत.
तसेच मौजे ओढरे/ चितेगांव / धानवड / नागदुली या प्रकल्पातील शेतकऱ्यांना मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वाढीव मोबदला प्रकल्पावर उपलब्ध निधी तसेच ठोक तरतूदी अंतर्गत उपलब्ध निधीच्या मर्यादेनुसार अंशत: रकमा अदा करण्यात आलेल्या आहेत.
(४) ८६७४ या लेखा शिर्षाअंतर्गत निधी मागणी प्रस्ताव अद्यापपावेतो महसूल व वन विभागाकडे सादर करण्यात आलेला नाही. तथापी, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात भूसंपादनासाठी ठोक तरतूद (न्यायालयीन प्रकरणे) ४७०१-एच-७६३ या लेखाशिर्षातर्गत शासनाकडून देण्यात आलेल्या रु.२५०.०० इतक्या निधीचे भूसंपादन कलम-१८/२८ च्या प्रकरणात वाटप करण्यात आले आहे.

तसेच महामंडळाने रक्कम रु.१३२३.४१३ कोटी इतका निधी मिळणेसाठी निधी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला असून मागणीकृत रकमेच्या किमान रु.५००.०० कोटी इतका निधी विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत रस्त्याची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४५) ५४७५८ (२४-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर व उस्मानाबाद तसेच नाशिक जिल्ह्यातील मातोश्री ग्रामसमृध्दी शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत रस्त्याची कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिवृष्टीमुळे सोलापूर व उस्मानाबाद तसेच नाशिक जिल्ह्यातील अनेक पाणंद शेत रस्ते खराब झाल्याने सदर मंजूर कामे अद्यापही सुरु झालेली नाहीत तसेच नव्यानेही अनेक कामे सुरु करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कामे मंजूर करुन निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२०-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे
नाशिक जिल्ह्यात अशी बाब आढळुन येत नाही.
(३) मातोश्री ग्राम समृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा निहाय आराखडे शासनस्तरावर मंजूर करण्यात आले आहेत. तसेच, सदर कामांकरीता अग्रीम स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कराड तालुक्यातील (जि.सातारा)टेंभु उपसा जलसिंचन योजनेतील पाण्याच्या फुगीमुळे कृष्णा नदीकाठी पाण्याखाली गेलेल्या जमिनींचा मोबदला शेतकऱ्यांना मिळणेबाबत

**(४६) ५४७८५ (२२-०१-२०२३). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कराड तालुक्यातील टेंभू प्रकल्पास सन १९९५ मध्ये मंजुरी मिळाली असून प्रत्यक्षात सन २००८-२००९ मध्ये पाणी अडवण्यास प्रारंभ झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पात अडवलेल्या पाण्याच्या फुगीमुळे नदीकाठची शेती पाण्याखाली गेली असल्याने प्रशासनाने या शेतीचा सर्व्हे करून शेतकऱ्यांना मोबदला दिला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्याप अनेक शेतकरी मोबदल्यांपासून वंचित राहिले असून शेतकऱ्यांच्या बुडीत क्षेत्राबद्दल मिळणारा मोबदला अत्यंत कमी असल्याने शेतकरी नाराज आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कराड तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

टेंभू प्रकल्पास प्रशासकीय मान्यता शासन निर्णय, दि.१९/०२/१९९६ अन्वये देण्यात आली आहे. कृष्णा नदीवरील टेंभू गावाजवळील मुख्य बॅरेज पूर्ण होऊन सन २००९ मध्ये अंशत: पाणीसाठा करणेत आला.

(२) होय, अंशत: खरे आहे.

टेंभू प्रकल्पासंदर्भात प्रकल्पात गेलेले एकूण बुडीत क्षेत्र १६२.०३ हे. आहे. यामधील ७२.०१ हे. क्षेत्र संपादित करण्यात आले असून रु. २०.२४ कोटी इतका मोबदला बाधित खातेदारांना अदा करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत ९०.०२ हे. क्षेत्र भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील मुल्यांकन समितीने चालू बाजार भावाप्रमाणे (ready recokner) निश्चित केलेल्या दराच्या आधारे शासन निर्णय, दि.१२/०५/२०१५ अन्वये थेट खरेदी अंतर्गत भूसंपादन मोबदला दिला जातो. उर्वरित जमीनीचे थेट खरेदीने शेतकऱ्यांचे संमतीने भूसंपादन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील डीपी रस्त्यांवरील विजेचे खांब आणि डीपी इतरत्र हलविण्याबाबत

**(४७) ५४८२१ (२०-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील डीपी रस्त्यांवरील विजेचे खांब आणि डीपी हलविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून दोन वर्षापूर्वी महावितरण कंपनीला १५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येऊनही अद्यापही विजेचे खांब वा डीपी हटविण्यात आली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) व (२) औरंगाबाद शहरातील डी.पी. रस्त्यावरील विजेचे खांब आणि डी.पी. इतरत्र हलविण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून दि.३१.०३.२०२१ रोजी महावितरण कंपनीस १५ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.तद्नंतर विद्युत पायाभूत सुविधा स्थलांतरित करण्याच्या कामांच्या प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी दि. २७/१०/२१ रोजी औरंगाबाद महापालिका, महावितरण व स्मार्ट सिटी कार्यालय यांच्या सहभाग असलेली एक संयुक्त समिती गठीत करण्यात आली. सदर समितीव्दारा कामांच्या लोकेशन मध्ये वेळोवेळी सुचविलेल्या बदलामुळे अंदाजपत्रकामध्ये फेरबदल झाला. अंतिमत: महावितरणमार्फत निविदा दि.२९/०६/२०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली व कामांचे कार्यादेश दि.१३/०१/२०२३ रोजी देण्यात आली. सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कासार सिरशी (ता.निलंगा, जि.लातुर) येथे महावितरण उपविभाग कार्यालय मंजूर करण्याबाबत

**(४८) ५४९६४ (२०-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण विभाग निलंगा (जि.लातूर) अंतर्गत उपविभाग निलंगा मध्ये १६४ गावांचा तसेच १० शाखा कार्यालये १७ उपकेंद्रांचा आणि ८२ हजार पेक्षा अधिक ग्राहक संख्येचा भार असल्याने प्रशासकीय कामासाठी व ग्राहकांना तत्परतेने सेवा मिळावी यासाठी उपविभाग निलंगा चे विभाजन करून कासार सिरशी ता.निलंगा येथे नवीन उपविभाग मंजूर करून

कार्यान्वित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर -आक्टोंबर २०२२ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषगाने सदर उपविभाग मंजूर करून कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) लातूर परिमंडळातील निलंगा विभागांतर्गत येणाऱ्या निलंगा उपविभागाचे विभाजन करुन नवीन कासार शिरशी उपविभाग दिनांक ३१.०१.२०२३ च्या आदेशाअन्वये मंजूर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## होटगी (ता.जि. सोलापूर ) येथे आदिवासी आश्रम शाळा सुरु करण्याबाबत

**(४९) ५४९७७ (१८-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होटगी (ता.जि. सोलापूर ) येथे आदिवासी आश्रम शाळा सुरु करण्याबाबत मागणी स्थानिक नागरिकांनी केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तुत मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच होटगी येथे आदिवासी आश्रम शाळा सुरु करण्याबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०२-२०२३) :** (१) व (२) आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २३.०९.१९८७ च्या शासन निर्णयानुसार होटगी (ता.जि.सोलापूर) येथे आश्रमशाळा मंजूर असून सदर शासकीय आश्रमशाळेत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात इ. १ ली ते इ. १० वी पर्यतचे एकूण ३१५ विद्यार्थी प्रवेशीत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जायकवाडी पाणी फुगवट्याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेले आदेश

**(५०) ५४९९४ (२२-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी धरण ७० ते ७५ टक्के भरल्यानंतर या धरणाचे पाणी संपादित जमिनीच्या व्यतिरिक्त आसपासच्या क्षेत्रातील इतर जमिनींमध्ये शिरून शेतमालाचे प्रचंड नुकसान होत असल्याबाबत गंगापूर तालुक्यातील (जि. औरंगाबाद) अमळनेर व आसपासच्या गावकऱ्यांनी जायकवाडी जलसंपदा विभागाकडे अनेक वेळा करुनही संबंधित अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेली रिट याचिका क्र. ३७२४/२०२० मध्ये मा.उच्च न्यायालयाने देखील जायकवाडी जलसंपदा विभागातील पाणी फुगवट्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व ग्रामस्थांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक ३७२४/२०२० मधील दिनांक २७.०९.२०२१ च्या आदेशात याचिकाकर्ते यांच्या जमिनीसंदर्भात शासन निर्णय, दिनांक २१.०९.२०१२ अन्वये कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले आहे. न्यायालयाच्या निदेशानुसार जलसंपदा विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांनी संबंधित क्षेत्राचा भूसंपादनाचा सुधारित प्रस्ताव दिनांक २७.०१.२०२३ रोजी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना सादर केला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव -१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.